**Dr. Kirit Somaiya**
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

**प्रसिद्धीसाठी**

सप्टेंबर ८, २००८

## महाराष्ट्रातील २० विधानसभा क्षेत्रात प्रचंड प्रमाणावर खोट्या मतदारांची नोंदणी

**-डॉ. किरीट सोमैय्या**

संपूर्ण महाराष्ट्रातील २८८ मतदारसंघात नवीन मतदार नोंदणीसाठी २५,१३,६०७ अर्ज (प्रपत्र क्र. ६)प्राप्त झाले आहेत. २०० हून अधिक विधानसभा क्षेत्रात २००० ते ६००० अर्ज प्राप्त झाले आहेत. त्याचवेळी, महाराष्ट्रातील सुमारे २० मतदारसंघात नवीन मतदार नोंदणीसाठी असामान्य संख्येत अर्ज प्राप्त झाले आहेत, असा आरोप भाजप नेता डॉ. किरीट सोमैय्या यांनी केला आहे.

पुणे जिल्ह्यातील मावळ (तळेगाव) विधानसभा मतदारसंघात ४३६२ अर्ज प्राप्त झाले आहेत, तर शेजारच्या चिंचवड विधानसभा मतदारसंघात ३८,०८९ तर, पिंपरी मतदारसंघात ५४,५६१ अर्ज प्राप्त झाले आहेत.

ठाणे जिल्ह्यातील नवीन ऐरोली विधानसभा मतदारसंघात ४२,७६८ आणि बेलापूर मतदारसंघात ३४,००३ अर्ज प्राप्त झाले आहेत.

मुंबईतील ३ विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी १६,००० पेक्षा अधिक म्हणजेच महाराष्ट्राच्या सरासरीपेक्षा २०० % अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. हे सर्व मतदारसंघ बांगलादेशीयांचे अड्डे आहेत.

| विधानसभा मतदारसंघ | प्राप्त झालेल्या प्रपत्र क्र. ६ ची संख्या |
|---|---|
| मानखुर्द | १९१०५ |
| अणुशक्ती नगर | १६,०४४ |
| चांदिवली | ३४,२५७ |

भाजपने भारतीय निवडणूक आयोगाला आणि महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना निवेदन सादर केले आहे. हे दुसरे तिसरे काही नसून निवडणूकीत केली जाणारी लबाडी आहे. प्रचंड खोटी मतदार नोंदणी, नकली आणि फसवणूकीने तयार केलेले निवासाचे पुरावे, नकली स्वाक्षांकन ही या प्रचंड संख्येतील अर्जांची सामान्य वैशिष्ट्ये आहेत.

डॉ. किरीट सोमैय्या यांनी निवडणूक आयोगाला सवाल केला आहे कि, शेजारच्या अंधेरी पूर्व विधानसबा मतदारसंघात नीवन नोंदणीसाठी अर्जांची (प्रपत्र क्र. ६)संख्या केवळ ४,०५७ असताना चांजदिवलीतून ३४,२५७ अर्ज कसे प्राप्त झाले आहेत ? मानखुर्द विधानसभा मतदारसंघात, शेवटच्या दिवसाच्या म्हणजेच २३ ऑगस्ट २००८ च्या आधीच्या दिवसापर्यंत, निवडणूक कार्यालयात ५२२५ अर्ज प्राप्त झाले होते. शेवटच्या दिवशी म्हणजेच २३ ऑगस्ट रोजी १९,१०५ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.. भाजपने सवाल केला आहे कि एका दिवसात १४,००० अर्ज कसे प्राप्त होऊ शकतात ?

संपूर्ण रायगड जिल्ह्यात आतापर्यंत ७ विधानसभा क्षेत्रात ८२,८२२ अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यापैकी केवळ पनवेल मतदारसंघातील अर्जच ३४,३९९ आहेत.

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com

**Dr. Kirit Somaiya**
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*





असामान्य अर्ज प्राप्ती दर्शविणारा तक्ता

| जिल्हा | विधानसभा क्षेत्र | प्राप्त झालेल्या अर्जांची (प्रपत्र क्र.६) संख्या |
|---|---|---|
| मुंबई | मानखुर्द | १९,१०५ |
| | चांदिवली | ३४,२५७ |
| | अणुशक्ती नगर | १६,०४९ |
| ठाणे | मीरा भायंदर | २६,५८७ |
| | ओवला माजीवाडा | १९.६९० |
| | ऐरोली | ४२,७६८ |
| | बेलापूर | ३४,००३ |
| | नालासोपारा | १९.९८३ |
| पुणे | चिंचवड | ३८,०३९ |
| | पिंपरी | ५४,५६१ |
| | भोसरी | २५,०५३ |
| | वडगाव शहर | २६,०४४ |
| | खडकवासला | १९,२९७ |
| | हडपसर | २०,०३६ |
| रायगड | पनवेल | ३४,३९९ |
| सोलापूर | सोलापूर मध्य शहर | १५,०६३ |

भाजपने असा आरोप केला आहे कि, ही सरकारी यंत्रणेचा वापर करून निवडणूका फसवणूकीने जिंकण्याचा अभिनव मार्ग आहे. असे समजते कि अनेक ठिकाणी, योग्य प्रकारे तपासणी, पडताळणी  न करता हजारो अर्ज स्वीकारण्यात आले आहेत. नवीन स्थानिक प्रशासनावर ते अर्ज स्वीकारण्यासाठी आणि त्यांची मतदार म्हणून नावनोंदणी करण्यासाठी दबाव टाकण्यात आला.

डॉ. किरीट सोमैय्या यांनी अशी मागणी केली कि अशा विधानसभा क्षेत्रासाठी एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी, अर्जादारांच्या घरी भेट देऊन आणि मूळ कागदपत्रे तपासून सर्व प्रपत्र क्र. ६ ची नीट तपासणी, पडताळणी करण्यात यावी, स्वाक्षांकनाची पडताळणी करण्यात यावी. निवडणूक आयोगाने सर्व नकली अर्ज रद्दबातल करण्यासाठी आणि निर्दोष मतदार याद्या तयार करण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत.

***प्रसिद्धी सचिव***



➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com